जा.क्र.कोजिप/स्वभामि/नियो-१/321/१५.
जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष,
जिल्हा परिषद, कोल्हापूर.
दि.३/6/२०१५.

प्रति,
१) गटविकास अधिकारी, पंचायत समिती----(सर्व)
२) गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती------- (सर्व)

विषय:-स्वच्छ भारत मिशन-
**'पहिला दिवस शाळेचा; हात धूण्याच्या सवयीचा'** आयोजनाबाबत.

शालेय विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छतेविषयी जागृती करणे, नवपिढिस आरोग्यदायी सवयींचा अंगीकार करण्याची मानसिकता निर्माण करणे, ती वृध्दींगत करणे आणि तिचे संवर्धन करणे आवश्यक आहे. याचाच एक भाग म्हणून या वर्षीच्या शैक्षणिक सत्राची सूरूवात स्वच्छतेने करण्यासाठी **दि.१५ जून २०१५** हा दिवस जिल्ह्यातील सर्व जिल्हा परिषद प्राथमिक शाळा यांच्यामध्ये **'पहिला दिवस शाळेचा; हात धूण्याच्या सवयीचा'** हा उपक्रम आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

**कार्यवाहीचे स्वरुप:-**

**उपक्रमाची तारीख व वेळ:-** दिनांक १५/६/२०१५ सकाळी ठिक ११.०० वा.

**सहभागी घटक:-** जिल्हा परिषद प्राथमिक शाळांचे सर्व शिक्षक, मुख्याध्यापक व विद्यार्थी.

**निमंत्रित घटक:-** पालक, गाव पातळीवरील सर्व पदाधिकारी, अधिकारी, तसेच तालूका स्तरीय अधिकारी व पदाधिकारी, व आपल्या तालूक्यातील मा. जिल्हा परिषद व पं.स.सदस्य व इतर सर्व सन्मानीय लोकप्रतिनिधी यांना या कार्यक्रमासाठी विशेष निमंत्रित करण्यात यावे.

**स्वरुप:-**

कार्यक्रमास प्रारंभ- सकाळी ठिक ११.०० वा.
कार्यक्रमाचे स्थळ-जिल्हा परिषदेच्या सर्व शाळा.
कार्यक्रमाचे स्वरुप:- खालील पध्दतीने मुख्याध्यापकांनी कार्यक्रम घ्यावयाचा आहे.

१) शाळेच्या पहिल्या दिवशी शाळा व्यवस्थापन समितीचे सर्व सदस्य, मुख्याध्यापक, शिक्षकांनी सर्व विद्यार्थ्यांचे शाळेत स्वागत करणे.
२) **पहिल्या दिवशीच्या पहिल्या परिपाठावेळी** सर्व विद्यार्थ्यांना हात धूण्याची योग्य पध्दत, त्याचे फायदे सांगण्यात यावे. तसेच स्वच्छतेचे महत्व, स्वच्छतेचे संदेश याची माहिती देण्यात यावी.
३) परिपाठाच्या वेळी **शाळेतील स्वच्छतादूत शिक्षकामार्फत 'हात धूवा' मोहिमेचे प्रात्याक्षिक दाखविणे व विद्यार्थ्यांकडून प्रातिनिधीक स्वरूपात करून घेणे व** पहिल्या परिपाठावेळी हात धूण्याची प्रतिज्ञा घेणे.(प्रतिज्ञा सोबत जोडली आहे.)
४) शाळा व अंगणवाडी स्वच्छतागृहे, पिण्याचे पाणी, प्रत्येक वर्गातील स्वच्छता संदेश फलक, वर्ग सजावट, परिसर स्वच्छता, बगीचा व अन्य स्वच्छतेबाबतच्या असलेल्या सुविधा सर्व विद्यार्थ्यांना मुख्याध्यापकांनी प्रत्यक्ष दाखवावे. तसेच शाळा स्वच्छतेची साधने मांडुन प्रदर्शन भरवावे. उदा: ब्रश, झाडु, टुथ पेस्ट, आरसा, कंगवा, साबण, टॉवेल, फिनाईल, नेलकटर, हात धूण्यासाठीची सर्व साधणे इत्यादी.